



दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com


**आजचा सुविचार**

स्वतःला कधीही कमी लेखू नका ;
तुमच्या आत्मविश्वासाने
अशक्य गोष्टी सुद्धा
शक्य होऊ शकतात.


वर्ष : ०५ | अंक : ९७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.२० नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# एकनाथ शिंदेंची अमित शाहांसोबत दिल्लीत तासभर चर्चा, मुंबईतही मोठ्या घडामोडी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, नवी दिल्ली :** महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या नाराजीनाट्याच्या घडामोडी सुरु आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या मंत्र्यांनी काल राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीवर बहिष्कार टाकला. भाजपकडून शिवसेनेच्या नेते, पदाधिकारी, माजी नगरसेवक आणि इतर कार्यकर्त्यांना जो पक्षप्रवेश देण्यात आला त्यावरुन शिवसेनेच्या मंत्र्यांमध्ये नाराजी आहे. तसेच अनेक ठिकाणी शिवसेनेच्या मंत्र्यांना आव्हान देणाऱ्या राजकीय नेत्यांना भाजपने प्रवेश देत बळ दिल्याची चर्चा आहे. त्यामुळे त्या पक्षप्रवेशांवर शिवसेनेच्या मंत्र्यांचा आक्षेप आहे. याबाबत शिवसेनेच्या मंत्र्यांनी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर काल मुख्यमंत्र्यांची भेट घेत नाराजी व्यक्त केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन्ही बाजू ऐकून घेत त्यावर तोडगा



काढला. आता सत्ताधारी महायुतीच्या पक्षांचे कार्यकर्ते, नेते, पदाधिकारी फोडायचे नाही, असं ठरलं. पण यानंतरही एकनाथ शिंदे यांची नाराजी दूर झाली नसल्याची चर्चा आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे आज अचानक दिल्ली दौऱ्यावर गेल्याची चर्चा आहे.

एकनाथ शिंदे आज दुपारी दिल्लीला रवाना झाले. दिल्लीत जावून त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी अमित शाह यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली. विशेष म्हणजे दोन्ही नेत्यांमध्ये जवळपास १ तास चर्चा झाल्याची माहिती आहे. यावेळी एकनाथ शिंदे यांनी अमित शाह यांच्याकडे नाराजी व्यक्त केल्याची माहिती टीव्ही ९ ने सूत्रांच्या हवाल्याने दिली आहे. खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मतदारसंघात ऑपरेशन लोटस राबवलं जात असल्याची खंत एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. तसेच विधानसभा निवडणुकीत शिवसेनेच्या उमेदवारांनी ज्यांचा पराभव केला त्यांना पक्षप्रवेश देत भाजपने त्यांची ताकद वाढवली, अशी देखील तक्रार एकनाथ शिंदे यांनी अमित शाह यांच्याकडे केल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या महायुतीत लढवल्या जातील, असं आश्वासन भाजपकडून देण्यात आलं होतं. पण सध्या राज्यात अनेक ठिकाणी भाजपने वेगळी चूल मांडल्याचं बघायला मिळालं आहे. त्यावरुनही एकनाथ शिंदे यांनी नाराजी व्यक्त केल्याची चर्चा आहे. दरम्यान, यानंतर आता अमित शाह यांच्याकडून काय तोगडा काढला जातो? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

एकनाथ शिंदे हे सातत्याने दिल्लीत जावून अमित शाह यांची भेट घेत असतात. गेल्या दोन महिन्यांत त्यांनी सलग तीनवेळा दिल्लीतील भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची भेट घेतली आहे. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीदेखील भेट घेतली होती. त्यानंतर आज एकनाथ शिंदे यांनी अमित शाह यांची भेट घेतली आहे.

एकनाथ शिंदे आणि अमित शाह यांच्या भेटीचं आणखी एक कारण आहे. आगामी काळात केंद्रीय मंत्रिमंडळात खांदेपालट होऊ शकतो. त्यावेळी शिवसेनेला काही अधिकचे पदं दिली जातात का? ते पाहणं महत्त्वाचं आहे. दुसरीकडे महाराष्ट्रात मंत्रिमंडळात शीतयुद्ध सुरु आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर फोडाफोडीच्या राजकारणाकाला गती मिळाली आहे. त्यावर शिवसेनेच्या मंत्र्यांची नाराजी होती. या फोडाफोडीच्या राजकारणबाबत चर्चा झाल्याची माहिती आहे.

### मुंबईतही मोठ्या घडामोडी !

एकनाथ शिंदे एकीकडे दिल्लीत अमित शाह यांच्या भेटीसाठी पोहोचले असताना इकडे मुंबईतही मोठ्या घडामोडी घडलेल्या बघायला मिळाल्या आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी गेले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल देखील उपस्थित होते. यावेळी तीनही नेत्यांमध्ये सध्याच्या राजकीय घडामोडींवर चर्चा झाल्याची शक्यता आहे. एकनाथ शिंदे यांची नाराजी कशी दूर करावी? याबाबत या भेटीत चर्चा झाल्याची शक्यता आहे. तसेच अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार पुण्यातील जमीन व्यवहार प्रकरणी अडचणीत आले आहेत. त्यामुळे याबाबतही बैठकीत चर्चा झाली असावी, असा अंदाज राजकीय वर्तुळात बांधला जात आहे.

# कुष्ठरोग मुक्त गावाच्या दिशेने निपाणा ग्रामपंचायतीचा संकल्प




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, बुलडाणा :** प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपळगाव देवी अंतर्गत येणाऱ्या निपाणा गावात कुष्ठरोग शोध मोहिमेच्या अनुषंगाने दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ रोजी ग्राम सभा उत्साहात पार पडली. सरपंच संतोष तांदुळकर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांनी एकत्रितपणे 'कुष्ठरोग मुक्त गाव' करण्याचा संकल्प केला.

१७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय मोहिमेत गावकऱ्यांचा मिळालेला उत्स्फूर्त सहभाग हे आरोग्यदायी समाजनिर्मितीकडे उचललेले मोठे पाऊल आहे. या प्रसंगी डॉ. निलेश जाधव – तालुका आरोग्य अधिकारी, डॉ. अंकिता इंगळे, डॉ. प्रवीण लहाने – वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी सौ. दादेराव, ग्रामपंचायत सदस्य जोशी, ग्रामसेवक श्री सुरडकर, आशा स्वयंसेविका व ग्रामस्थ उपस्थित होते.

ग्रामसभेत कुष्ठरोगाविषयी जनजागृती, घराघरात तपासणी, प्रतिबंधात्मक उपाय आणि वेळेवर उपचार याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. निपाणा ग्रामस्थांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे 'कुष्ठरोग मुक्त गाव' हे स्वप्न साकार होण्याच्या दिशेने गावाने भक्कम पाऊल टाकले.

# ब्रम्हपुरीतील इथेनॉल प्रकल्पात भीषण स्फोट २ ते ३ किलोमीटरपर्यंत धक्के, सुदैवाने जीवितहानी नाही



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१९, ब्रम्हपुरी (चंद्रपूर) :** ब्रम्हपुरी शहरालगत असलेल्या बोरगाव रोडवरील रामदेव बाबा सॉलव्हनंटस(आरबीएस) कंपनीच्या इथेनॉल प्रकल्पात आज (दि.१९) सायंकाळी प्रचंड स्फोट होऊन भीषण आग लागली. ब्रम्हपुरी जवळील बोरगाव गावाच्या रस्त्यावर असलेल्या रामदेव बाबा सॉल्व्हंट फॅक्टरीच्या समोरील इथेनॉल प्रकल्पात सायंकाळी सुमारे ५:३० वाजताच्या सुमारास मोठी आग लागली. आग लागल्यानंतर काही क्षणांतच प्रचंड स्फोट झाला आणि त्याचा धक्का तब्बल २ ते ३ किमीपर्यंत जाणवल्याने जनजीवन काही क्षणासाठी स्थिरावले. या धक्क्याचा प्रभाव बोरगाव, उदापूर, झिलबोडी, फुलेनगर, पेठवॉर्ड, धुमणखेडा, शिवाजी चौक आणि ब्रह्मपुरी शहरातील विविध भागांमध्ये स्पष्टपणे जाणवला. अनेकांनी घरं हलल्याचा अनुभव सांगितला असून काही घरांची काच फुटल्याची चर्चाही सुरु आहे.

कंपनी परिसरात १.२५ लाख लिटर इथेनॉलचा साठा असल्याचे समोर आल्याने आग अधिक भीषण स्वरूप धारण करण्याची भीती व्यक्त होत आहे. प्रकल्प नुकताच पुन्हा सुरू झाल्याचेही समजते. घटना घडल्यानंतर ब्रह्मपुरी, नागभीड, सिंदेवाही, मूल तसेच गडचिरोली आणि वडसा येथील फायर ब्रिगेड पथके तातडीने पोहोचली. आग मोठ्या प्रमाणात असल्याने महानगरपालिका चंद्रपूरकडून फोम सोल्यूशनसह दोन फायर टेंडरही रवाना करण्यात आली आहेत. यासोबतच पोलीस दल व डॉक्टरांची टीमही घटनास्थळी तातडीने दाखल झाली आहेत. घटनास्थळी प्रचंड धुराचे लोट उठत असून परिसरातील नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सुरक्षा कारणास्तव परिसरातील रस्ते तात्पुरते बंद करण्यात आले आहेत. आगीचे नेमके कारण अद्याप समोर आले नसून घटनेची सखोल चौकशी जिल्हा प्रशासनाने सुरू केली आहे.

# राजशिष्टाचाराची खिल्ली उडविणाऱ्या मनपा अधिकाऱ्यांना खा.धानोरकरांनी दिला इशारा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, चंद्रपूर :** चंद्रपूर शहर महानगरपालिका प्रशासनाच्या मनमानी कारभाराला आणि जनप्रतिनिधींच्या राजशिष्टाचार पाळण्यात होत असलेल्या दुर्लक्षाला खासदार प्रतिभा धानोरकर यांनी आज थेट महानगरपालिका गाठून जाब विचारला. खासदार प्रतिभा धानोरकर यांनी यावेळी आपल्या समर्थकांसह महानगरपालिका आयुक्तांच्या दालनात धडक देत त्यांना घेराव घातला आणि प्रोटोकॉल भंगासह निधी वाटपातील भेदभावावर जाब विचारला. प्रशासनाने तात्काळ राजशिष्टाचार पाळावा, लोकप्रतिनिधींना सन्मान द्यावा आणि निधी वाटप करताना कोणताही भेदभाव करु नये, अन्यथा याचे गंभीर परिणाम प्रशासकीय अधिकाऱ्यांनी भोगण्यास तयार राहावे, असा थेट इशारा खासदार प्रतिभा धानोरकर यांनी यावेळी आयुक्तांना दिला.



गेल्या काही दिवसांपासून मनपा प्रशासनातील अधिकारी लोकप्रतिनिधींशी योग्य समन्वय साधत नाहीत. शासकीय भूमीपूजन सोहळ्यात लोकप्रतिनिधींना डावलले जात होते. तसेच, शहराच्या काही भागांमध्ये निधी वाटप करतांना हेतुपुरस्पर भेदभाव केला जात असून, आवश्यक कामे बाजुला ठेवली जात असल्याचा गंभीर आरोपही खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केला.

या गंभीर प्रकाराने संतप्त झालेल्या खासदार प्रतिभा धानोरकर यांनी आज चंद्रपूर शहर महानगरपालिका गाठले आणि आयुक्ताच्या दालनात पोहोचताच प्रशासनाच्या या कार्यपध्दतीवर तीव्र संताप व्यक्त केला.

राजशिष्टाचाराचा भंग करणे म्हणजे लोकशाही व्यवस्थेचा आणि जनतेच्या मतांचा अपमान आहे. प्रशासकीय अधिकारी जाणूनबुजून लोकप्रतिनिधींना डावलत आहेत आणि त्यामुळे शहराच्या विकासाची कामे, रस्ते, आणि पाणीपुरवठ्यासारख्या तातडीच्या समस्यांकडे दुर्लक्ष होत आहे, असे त्या म्हणाल्या.

यावेळी महानगरपालिका आयुक्त विद्या गायकवाड, अतिरिक्त आयुक्त चिद्रवार, शहर कॉंग्रेस अध्यक्ष संतोष लहामगे, शहर कॉंग्रेस माजी अध्यक्ष रामू तिवारी, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष सोहेल रजा, ओबीसी जिल्हाध्यक्ष प्रशांत दानव, युवक कॉंग्रेस अध्यक्ष राजेश अडूर, इंटक युवा नेते प्रशांत भारती, भालचंद्र दानव, माजी नगरसेवक पिंटू शिरवार, कॉंग्रेस युवा नेते राहुल चौधरी, नौशाद शेख, गुंजन येरमे, सौरभ ठोंबरे यांची उपस्थिती होती.

# रुई येथील रस्त्याचा प्रश्न चिघळला; ग्रामस्थांचे आमरण उपोषण सुरू

**▶ या आहेत मुख्य मागण्या :**

जुना रुई ते खेडले झुंगे बोरमाथा रस्त्यास त्वरित मंजुरी मिळावी, या रस्त्याचे अतिक्रमण काढून सुरळीत करण्यात यावा, ठिकठिकाणी शेतकऱ्याच्या शेतातील पाणी निघण्यास सिमेंट पाईप टाकण्यात यावे, रस्त्याच्या कामात अडथळा आणणाऱ्या शेतकऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी, या रस्त्याच्या कडेला पाणी वाहून जाण्यासाठी साईड गटार (नाली) करण्यात याव्या.

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१९, विंचूर (नाशिक) :** जुना खेडलेझुंगे रस्त्याची अवस्था दयनीय झाल्याने नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे या रस्ता कामास तातडीने मंजुरी मिळून काम सुरू व्हावे या मागणीसाठी रुई ता.निफाड येथील ग्रामस्थ उपोषणास बसले आहेत. येत्या दोन दिवसात ठोस निर्णय न झाल्यास आगामी निवडणुकांवर बहिष्कार टाकून तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

रूई येथील जिल्हा परीषद मार्ग क्रं.२६६, कि.मी.११ ते १३ या जुना खेडला रस्त्याचे गत वीस वर्षापासून काम झालेले नाही. या रस्त्यालगत दाट




लोकवस्ती आहे. हा रस्ता दळण वळण, शेतमाल वाहतुक व शालेय विद्यार्थ्यांना जाणे येणे साठी खूप महत्वाचा आहे. सदर रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. त्यामुळे या रस्त्यावर वारंवार छोटे मोठे अपघात होत असतात. रस्त्याच्या दुरावस्थेमुळे रुग्णास रुग्णालयात नेण्यासाठी व उपचारासाठी जाणे कामी फार उशीर होतो, त्यामुळे रुग्णांचे प्रचंड हाल होत आहे. रस्त्याच्या प्रश्नाबाबत वेळोवेळी स्थानिक लोकप्रतिनिधी, जि.प.सदस्य, पंचायत समिती सदस्य, तहसिलदार, आमदार यांना पत्र व्यवहार तसेच लेखी निवेदन देऊनही अनेक वर्षापासून ही मागणी प्रलंबित असुन न्याय मिळत नाही, म्हणून दि.१९ नोव्हेंबर पासून रूई धानोरे ग्राम पंचायत कार्यालयासमोर रामदास तासकर यांचे नेतृत्वाखाली अंकुश तासकर, विलास गायकवाड, बापू रोटे, निलेश रोटे, बापू तासकर, लीलाबाई बोरगुडे, संतोष तासकर, शोभा रोटे, संदीप रोटे, सुनील तासकर, बाळासाहेब गायकवाड, वैभव तासकर, लखन तासकर, महेश झुरळे, योगेश रोटे, बापू गायकवाड, राजू बोरगुडे, पिराजी तासकर, सुनिल शिंदे आदींसह आमरण उपोषण सुरू केले आहे.

त्यानंतर निर्माण होणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी ही प्रशासनाची राहील, तरी शासनाने येत्या दोन दिवसात निर्णय घेऊन आमच्या मागण्या पूर्ण कराव्यात अन्यथा आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीवर आम्ही बहिष्कार टाकणार असून तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा निवेदनाद्वारे इशारा दिला आहे.

निवेदनाच्या प्रति मा.जिल्हाधिकारी, मा.पोलीस अधिक्षक, मा.तहसिलदार, मा.गटविकास अधिकारी, सहाय्यक पोलिस निरीक्षक लासलगाव यांना देण्यात आल्या आहेत.

# अटक न करण्यासाठी मागितले ५० हजार

**दि.१९, नागपूर :** अल्पवयीन मुलीचा विनयभंग व पोक्सो प्रकरणातील साक्षीदाराला अटक करण्याची धमकी देत ५० हजारांची लाच मागितल्याप्रकरणी हिंगणा पोलिस ठाण्याच्या महिला पोलिस उपनिरीक्षकाला सदर पोलिसांनी मंगळवारी न्यायालय परिसरातून ताब्यात घेतले. न्यायालयाच्या आदेशानंतर ही कारवाई करण्यात आली. पुढील कारवाईसाठी दस्तऐवजांसह महिला पोलिस उपनिरीक्षकाला परिमंडळ एकचे पोलिस उपायुक्त ऋषिकेश सिंगारेड्डी यांच्या पथकाच्या स्वाधीन करण्यात आले. दीक्षा ताजणे, असे तिचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी हिंगणा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वानाडोंगरी परिसरात नीट परीक्षेची तयारी करणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीची कारचालकाने छेड काढली. कारचालकाच्या मित्राने छेड काढण्याचे मोबाइलद्वारे चित्रीकरण केले. याप्रकरणी मुलीच्या नातेवाइकाने दिलेल्या तक्रारीवरून हिंगणा पोलिसांनी विनयभंग व पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करून कारचालक लीलाधर समर्थ (वय ३७) याला अटक केली. याप्रकरणात त्याच्या मित्राला साक्षीदार बनविण्यात आले.




## फ्लाईंग शीख मिल्खा सिंग




भारतातीलच नव्हे तर जगातील महान धावपटूत ज्यांची गणना होते असे भारताचे महान धावपटू फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांची आज जयंती. फ्लाईंग शीख अशी उपाधी मिळालेल्या मिल्खा सिंग यांचा जन्म २० नोव्हेंबर १९२९ रोजी पंजाबातील गोविंदपुरा या गावी एका गरीब शीख कुटुंबात झाला.

मिल्खा सिंग यांना लहानपणापासून धावण्याची खूप आवड होती. राष्ट्रीय पातळीवरील धावण्याच्या अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी यश मिळवले मात्र मिल्खा सिंग प्रकाशझोतात आले ते १९५८ साली. यावर्षी कार्डिफ येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत त्यांनी ४०० मीटरच्या शर्यतीत त्यांनी सुवर्णपदक मिळवले. मिल्खा सिंग हे राष्ट्रकुल स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक जिंकणारे स्वतंत्र भारतातील पहिले खेळाडू होते.

त्यानंतर १९५८ च्या टोकियो येथे झालेल्या आशिआई स्पर्धेत मिल्खा सिंग यांनी २०० आणि ४०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. एकाच आतंरराष्ट्रीय स्पर्धेत दोन सुवर्णपदक मिळवणारे ते भारताचे पहिले खेळाडू आहेत. १९६२ च्या जकार्ता आशिआई स्पर्धेतही त्यांनी ४०० मीटर आणि ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. १९६० च्या रोम ऑलम्पिक स्पर्धेत मिल्खा सिंग यांचे पदक अतिशय सूक्ष्म फरकाने हुकले. या ऑलिम्पिकमध्ये मिल्खा सिंग यांनी ४०० मीटर शर्यत ४५. ७३ सेकंदामध्ये पूर्ण केली. जर्मनीचा धावपटू कार्ल कुफमॅनपेक्षा ते सेकंदाच्या १०० व्या भाग एव्हढ्या कमी फरकाने मागे राहिले. अतिशय सूक्ष्म फरकाने ऑलिम्पिक पदक हुकल्याने जगभरातील क्रीडाप्रेमींनी हळहळ व्यक्त केली. त्यांचे ऑलिम्पिक पदक हुकले तरी त्यांनी शर्यत पूर्ण केलेली ही वेळ राष्ट्रीय विक्रम ठरली विशेष म्हणजे त्यांचा हा राष्ट्रीय विक्रम ४० वर्ष अबाधित होता. याच स्पर्धेदरम्यान त्यांची भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाच्या कर्णधार निर्मल कौर यांच्याशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. त्यांच्या पत्नीचेही नुकतेच कोरोनाने निधन झाले आहे. त्यांचे पुत्र जीव मिल्खा सिंग हे प्रसिद्ध गोल्फपटु आहेत. मिल्खा सिंग यांना फ्लाईंग शीख ही उपाधी पाकिस्तानचे प्रमुख पाकिस्तानचे माजी प्रमुख आयुब खान यांनी दिली.

१९६० साली पाकिस्तानचा पाकिस्तानचा जगप्रसिद्ध धावपटू अब्दुल खालीक याने आव्हान दिले. मिल्खा सिंग यांनी त्याला पाकिस्तानमध्ये जाऊन हरवले. ते या स्पर्धेत ज्या प्रकारे धावले ते पाहून पाकिस्तानमध्येही ते खूप लोकप्रिय झाले ही स्पर्धा पाहण्यासाठी आयुब खान स्वतः हजर होते. या स्पर्धेनंतरच आयुब खान यांनी त्यांना फ्लाईंग शीख ही उपाधी दिली. भारत सरकाररनेही त्यांना अर्जुन व पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांचा योग्य गौरव केला. त्यांच्या जीवनावर आधारित भाग मिल्खा भाग हा चित्रपट येऊन गेला या चित्रपटात फरहान अखतर यांनी मिल्खा सिंग यांची भूमिका केली होती. मिल्खा सिंग हे भारतातीलच नाही तर जगभरातील धावपटूंचा आदर्श होते. निवृत्तीनंतर त्यांनी तरुण धावपटूंना मार्गदर्शनही केले. मिल्खा सिंग यांचे चार वर्षापूर्वी १८ जून २०२१ रोजी कोरोनाने निधन झाले त्यांच्या त्यांच्या निधनाने भारतीय क्रीडा क्षेत्राची मोठी हानी झाली.

**मिल्खा सिंग यांना**
**जयंतीदिनी विनम्र आदरांजली!**

# फेरीवाला प्रश्नातील - अर्थकारण, राजकारण



अवैध फेरीवाला हा मुंबईसाठी रोग'अशी टिप्पणी ऊच्च न्यायालयाने नुकतीच केली आहे. मुंबईच कश्याला शहरी भाग असो कि ग्रामीण भाग असो जिकडेतिकडे अवैध फेरीवाले फोफावले आहे पादचाऱ्यांना चालण्यासाठी बनवलेले पदपथ फेरीवाल्यांनी काबिज केले आहे. फेरीवाल्यांना छुपेबळ, आशिर्वाद असतो तो, ज्यांच्याकडे अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्याची जबाबदारी असते त्यांच्यातील काही झारीतील शुक्राचार्यांचा. अर्थात यात मोठी देवाणघेवाण होते, हप्ते वसुली होते, माफियागिरी वाढते. तसेच जाता-येता सोयीचे, स्वस्तात मस्त म्हणून तुम्ही आम्ही सगळेच फेरीवाल्यांना पसंती देतो.मुख्यत्वे करून शहरातील फुटपाथ, बस /रेल्वे स्थानक परिसर तर फेरीवाल्यांनी व्यापुनच टाकला आहे, यातही हे सगळे अनधिकृतपणे चालत आहे. नाशिक, नागपूर, अकोला, संभाजी नगर, पुणे सारखी शहरे तर फेरीवाल्यांच्या विळख्यात सापडली आहेत.

१९८२ साली सर्वोच्च न्यायालयाने फेरीवाल्यांबाबत धोरण असावे असे सांगितले मात्र याबाबत विचार होण्यास तब्बल २००९ साल उजाडले. तेव्हा फेरीवाल्यांबाबत धोरण आखण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी लोकसंख्येनुसार अधिकृत फेरीवाल्यांना परवाने देऊन हॅकिंग झोन ठरवावे असा निर्णय झाला, मात्र आजतागायत कुठेही फेरीवाल्यांबाबत निर्णय न झाल्याने जागोजागचे पदपथ अशा अनधिकृत व्यावसायिकांनी बळकावले आहेत आणि कर भरून देखील सामान्यांनाच त्याचा त्रास सहन करावा लागत आहे.फेरीवाल्यांवरून व्यवसायात सुसूत्रता आणण्यासाठी शहर फेरीवाला समिती, प्रभाग फेरीवाला समिती, फेरीवाला तांत्रिक समिती स्थापन करण्याचे शासन आदेश निघाले. नागरी, शहरी भागातील फिरते आणि एका जागी व्यवसाय करणारे यांची नोंदणी करणे, परवाने देणे, फेरीवाले किती असावेत याबाबत धोरण आखणे असे अनेक निर्णय घेतले गेले मात्र ते फक्त कागदावरच रहाता. फेरीवाल्यांवरून राजकारण, सत्ताकारण होते मात्र फेरीवालामुक्त रस्ते असावेत अशी कोणाचीच


**अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**मोबा. ९१५८४९५०३७**

इच्छाशक्ती आणि मानसिकता नाही. कर भरुनही नागरिकांना मात्र आर्थिक भुर्दंड आणि त्रास सहन करावा लागतो. फेरीवाल्यांकडुन अनेकदा झुंडशाहीने सामान्य नागरिकांवर छोट्या छोट्या कारणावरून हल्ले केले जातात. काही वर्षांपूर्वी ठाण्यात पालिकेच्या कल्पना पिंगळे महिला अधिकाऱ्यावर हल्ला झाला होता. फेरीवाल्यांकडुन हप्ते वसुली करून अनेकांचे तोडपाणी होत असल्याने देखील या समस्येवर तोडगा काढण्यासाठी विलंब होत असावा. स्थानिक पातळीवर अर्थकारण आणि हितसंबंध मोठ्या प्रमाणावर कारणीभूत आहेत, अनेक ठिकाणी कुंपणच शेत खाते आणि झारीतील शुक्राचार्यच यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

फेरीवाल्यांना हटविण्यासाठी कारवाई होत असतांना त्याची सुचना त्यांना अगोदरच मिळते आणि कारवाई केवळ फार्स ठरतो.काही वर्षांपूर्वी मुंबईत मनसे कार्यकर्त्यांवर देखील फेरीवाल्यांकडुन हल्ला केला होता. अनधिकृत फेरीवाल्यांमध्ये परप्रांतीयांची संख्या अधिक असल्याने अनेकदा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. ऐकुणच या समस्येवर उपाय योजना करण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी तसेच प्रशासकीय यंत्रणांनी गांभीर्याने प्रयत्न करायला हवेत. व्यवसाय करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे.

मात्र त्याचवेळी सामाजिक जबाबदारीचे भान देखील बाळगणे आवश्यक आहे. फेरीवाला प्रश्नात मोठे अर्थ कारण आणि राजकारण दडले असल्याने या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा निघत नाही.

# ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनासांठी कडक नियमावली गरजेची...

सद्या साखर कारखान्याचा गळीत हंगाम मोठ्या जोमाने सुरू झाल्याने सर्वच मार्गावर ऊसाची वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मात्र क्षमतेपेक्षा अधिक ऊसाची वाहतूक करणाऱ्या वाहनांचा धोका वाढला आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहनाच्या पाठीमागे अथवा बाजूला कोणत्याही उपाययोजना नसल्याने अपघाताचे प्रकार वाढताहेत. उसाची वाहतूक करत असताना ट्रॅक्टरच्या पाठीमागे कधी एक तर कधी दोन ट्रॉली असतात. त्यामुळे ऊस वाहतूक करतांना समोरून येणाऱ्या गाडीला फक्त ट्रॅक्टर दिसतो. परंतु त्या ट्रॅक्टरच्या पाठीमागे असलेल्या ट्रॉलीवर कोणतेच इंडिकेटर अथवा रिफ्लेक्टर नसल्याने अचानक फसगत होते. बऱ्याचदा वाहनांच्या एकदम जवळ आल्यावर त्या ट्रॉली दिसतात कधी, कधी ट्रॅक्टर अचानक बंद पडतो. मग तो ट्रॅक्टर रात्रभर रस्त्यावर किंवा रस्त्याच्या कडेला थांबून ठेवला जातो. ट्रॅक्टर बंद असल्याने त्यावरती कोणतेच इंडिकेटर नसल्याने अंधारात ट्रॅक्टर रस्त्यावर असलेले दिसत नाही आणि त्यामुळे बरेच वाहने येऊन त्या बंद असलेल्या ट्रॅक्टरला धडकतात.



यामुळे सुद्धा बरेच अपघात घडतात ट्रॅक्टरवर लावलेले स्पीकर खूप मोठ्याने वाजवले जातात. त्यामुळे ट्रॅक्टरच्या पाठीमागे काय घडते याचा वाहन चालकाला अंदाज येत नाही. उसाची वाहतूक रात्रभर चालूच असते आणि स्पीकर मोठमोठ्याने चालूच असल्याने रस्त्याकडील गावातील लोकांची झोपमोड होते. ट्रॅक्टरही वेगाने चालवले जातात तसेच अंधारातून बैलगाडीने ऊस वाहतूक केली जाते. ऊसाने भरलेली बैलगाडी अंधारात जात असताना समोरून आणि पाठीमागून येणाऱ्या वाहनांना बैलगाडी दिसत नाही. कधी, कधी ऊस वाहतूक करणारे वाहनधारक वाहनांचा एकचं बल्ब लावून वाहन चालवतात. त्यामुळे सुद्धा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी नजीकच्या काळात अपघात होऊ नयेत. यासाठी आरटीओ प्रशासनाने तातडीने ऊस वाहतूक करणाऱ्या सर्वच वाहनासाठी नियमावली तयार करून काटेकोरपणे अमंलबजावणी करण्यासाठी ठोस पावले उचलणे गरजेचे आहे.

**- राजू जाधव,**
**मांगूर जि.बेळगांव**

## क्लीन चीट..

कुठल्या कमिटीवरी
अधिकारी हवे धीट
जबाबदारीनिभवता
कर्मयोग करावानीट

घाई घाईत कुणाला
ना द्यावी क्लीनचीट
स्पष्टता हवी विचारे
करुनका कुणा चीट

येणारं नक्की दबाव
ही नावे करा डिलीट
स्वच्छ बनवा प्रतिमा
होऊन निष्णातपरीट

मत सतत बदलायले
नाहीआपण गिरगीट
असे रिपोर्ट कसलेही
डोळे रोखतात रागीट

पाया भक्कम कराया
तपासावी प्रत्येकवीट
समतोलन्याय सर्वास
माधुर्य राहणारंअवीट

समितीमागून समिती
क्लिष्टतेची येतेयं वीट
स्वताच्या शिंगाचागर्व
स्वतातफसे काळवीट

ठोस पुराव्यांचेआधारे
निर्णयअसावे कांक्रीट
निश्चित निश्चल रहावे
भले करुद्या किटकिट

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# वाढती थंडी : फायदे आणि नुकसान !

**- शब्दांकन -**
**साहेबराव परबत**



दरवर्षी नोव्हेंबरपासून जानेवारीपर्यंत तापमानात झपाट्याने घट होते आणि उत्तर भारताबरोबरच महाराष्ट्र, कर्नाटक, मध्य प्रदेशसह देशाच्या अनेक भागांमध्ये हिवाळ्याची चाहूल स्पष्ट जाणवू लागते. वाढत्या थंडीचा दैनंदिन जीवनावर सर्वांगीण परिणाम होत असतो. थंडी म्हणजे फक्त गार वातावरण नाही, तर आरोग्य, शेती, उद्योगधंदे आणि सामाजिक वर्तनावर प्रभाव टाकणारा एक महत्त्वाचा ऋतू. तापमानातील या घसरणीमुळे काही ठिकाणी फायद्याचे तर काही ठिकाणी नुकसानकारक चित्र दिसून येते.

**• थंडीचे फायदे...**

**१) आरोग्यासाठी लाभदायी हवा**

हिवाळ्यातील थंड, शुष्क हवा शरीराला हलकी वाटते. गरमीमुळे येणारा थकवा कमी होतो. शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते. थंड हवेमध्ये मन ताजेतवाने राहते आणि काम करण्याची उर्जा वाढते. अनेक संशोधनांनुसार हिवाळ्यातील सूर्यकिरणांमुळे व्हिटॅमिन 'डी'चे प्रमाण शरीरात वाढते, जे हाडांसाठी तसेच एकूण आरोग्यासाठी आवश्यक असते.

**२) शेतीसाठी अनुकूल वातावरण**

थंडी हा भारतीय शेतीसाठी अत्यंत महत्त्वाचा ऋतू आहे. रब्बी हंगामातील गहू, हरभरा, ज्वारी, ओट या पिकांना थंड हवामानाची गरज असते. तापमान योग्य राहिल्यास या पिकांची वाढ जोमदार होते. थंडीमुळे अनेक किडींचा प्रादुर्भाव कमी होतो आणि पिके रोगमुक्त राहतात. त्यामुळे उत्पादनवाढीला मदत मिळते. हिमालयीन भागात बर्फवृष्टीमुळे भूजलस्तर संतुलित राहतो, जो उन्हाळ्यातील पाण्याची उपलब्धता निश्चित करतो.

**३) पर्यटनाला चालना**

हिवाळा म्हणजे पर्यटनाचा 'पीक सिझन'. देशातील जवळपास सर्व पर्यटनस्थळांवर पर्यटकांची गर्दी वाढते. शिमला, मनाली, काश्मीर, दार्जिलिंगसारख्या हिम प्रदेशात बर्फाच्छादित पर्वतांचे आकर्षण वाढते. दक्षिण भारतातही मंद उष्णता आणि थंड हवामानामुळे प्रवास सुखकर बनतो. त्यामुळे हॉटेल्स, टॅक्सी, मार्गदर्शक, स्थानिक बाजारपेठ या सर्व क्षेत्रांना आर्थिक लाभ मिळतो.

**४) उद्योग आणि कामगारांसाठी अनुकूलता**

उष्ण वातावरणात मेहनतीच्या कामांमध्ये शरीरावर ताण येतो, पण हिवाळ्यात काम करणे तुलनेने सोपे वाटते. बांधकाम, शेती, वाहतूक, औद्योगिक यंत्रसामग्री या क्षेत्रांतील कार्यक्षमता थंड ऋतूमध्ये वाढते. दीर्घकाळ काम करताना होणारा थकवा कमी असल्याने उत्पादनक्षमता सुधारते.

**• वाढत्या थंडीचे नुकसान...**

**१) आरोग्याच्या समस्या...**

थंडी जितकी लाभदायी तितकीच काहींसाठी धोकादायकही ठरते. तापमानातील घटेमुळे सर्दी, खोकला, दमा, दमा, निमोनिया, सांधेदुखी या तक्रारी वाढतात. वृद्ध, लहान मुले आणि हृदयविकार असलेल्यांवर थंडीचा परिणाम अधिक जाणवतो. उत्तरेकडील राज्यांत धुके आणि प्रदूषण मिसळल्याने 'स्मॉग' तयार होतो, जो श्वसनाच्या आजारांना आमंत्रण देतो.

**२) गरीब व वंचितांसाठी कठीण परिस्थिती...**

हिवाळा हा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी मोठे आव्हान आहे. झोपडपट्टीतील कुटुंबांकडे पुरेशी ऊबदार साधने नसतात. रस्त्यावर राहणाऱ्या बेघर लोकांना थंडीपासून बचाव करणे अवघड होते. शासकीय निवारा केंद्रांची कमतरता आणि उबदार कपड्यांचा अभाव यामुळे दरवर्षी थंडीमुळे मृत्यूंच्या घटनाही घडतात.

**३) वाहतूक व उद्योगांवर परिणाम**

अत्यंत गार हवामान आणि धुक्यामुळे रेल्वे, विमानसेवा आणि रस्ते वाहतुकीवर परिणाम होतो. दृश्यता कमी झाल्याने अपघातांची शक्यता वाढते. शिपिंग किंवा लॉजिस्टिक कंपन्यांना विलंबामुळे नुकसान होते. उत्तर भारतात तापमान अत्यंत खाली गेल्यास पाईपलाईन, पाणीपुरवठा, तसेच काही उद्योग यंत्रणाही तात्पुरत्या बंद ठेवाव्या लागतात.

**४) शेतीतील अति थंडीचे दुष्परिणाम**

थंडी योग्य प्रमाणात असली तर शेतीला लाभ होतो. पण अचानक गारठा वाढल्यास किंवा थंडीचा अतिरेक झाल्यास गहू, कांदा, बटाटा यांसारख्या पिकांवर प्रतिकूल परिणाम होतो. दंव पडल्यास पानांवर पाणी गोठते आणि पिकांची वाढ थांबते. महसूल विभागाकडून अनेकदा 'हिवाळी आपत्ती' जाहीर करण्याची वेळ येते.

**• समतोल राखणे गरजेचे**

वाढत्या थंडीचे फायदे-तोटे दोन्ही असल्याने समाजाने तसेच शासनाने सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

- कमकुवत घटकांना उबदार कपड्यांचे वितरण
- रुग्णालयांमध्ये पुरेशा सोयी
- वाहतुकीची पूर्वतयारी
- शेतकऱ्यांसाठी हवामान अंदाजाची योग्य माहिती

ही पावले उचलल्यास थंडीचा दुष्परिणाम कमी करता येतो. हिवाळ्याचा ऋतू हा निसर्गातील संतुलनाचा महत्त्वाचा घटक आहे. योग्य खबरदारी आणि नियोजन केल्यास हा ऋतू आनंददायी ठरू शकतो आणि त्याचे लाभ समाजापर्यंत प्रभावीपणे पोहोचू शकतात.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## लासलगावमध्ये भुरट्या चोरांचा धुमाकूळ; दोन मंदिरात चोरी



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१९, विंचूर (नाशिक) :** लासलगाव येथील वार्ड क्रमांक तीन, गणेशनगर परिसरात भुरट्या चोरट्यांनी दोन वेगवेगळ्या मंदिरांना लक्ष्य करत चोरीच्या घटना घडल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गणेश नगर येथील श्री गणेश मंदिरात रात्री सुमारे अडीच ते तीनच्या दरम्यान चोरट्याने सुमारे १० हजार रुपये किमतीच्या दोन समया लंपास केल्या. तसेच जवळच असलेल्या दुर्गा माता मंदिरामधून चांदीचे टोप, कासव आणि अन्य काही चांदीच्या वस्तूची चोरी करण्यात आली असून संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाली आहे. गेल्या महिन्यात शास्त्रीनगर येथील स्वामी समर्थ मंदिरातही चोरी झाली होती. याशिवाय काही ज्वेलर्स दुकानांमधून अंगठ्यांची चोरी झाल्याने भुरट्या चोरांचे प्रमाण वाढल्याबाबत नागरिकांमध्ये चिंता पसरली आहे. घटनास्थळी लासलगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर शिंदे, सहायक पोलीस उपनिरीक्षक उगले यांनी भेट देत तपास सुरू केला असून नाशिकहून डॉग स्कॉड ही दाखल झाले आहे. लासलगाव परिसरातून अशा चोरट्यांवर तातडीने अंकुश आणण्याची मागणी होत आहे.

## रस्ते अपघातात जीव गमावलेल्या व्यक्तींच्या स्मरणार्थ स्मृतीदिन समारोह संपन्न




**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.१९, डोंबिवली (ठाणे) :** रस्ते अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या स्मरणार्थ दरवर्षी जगभर पाळण्यात येणाऱ्या स्मृतीदिनानिमित्त शहर वाहतूक नियंत्रण उपशाखा डोंबिवली आणि सेफ्टी वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ठाकुरली येथील एम.के.एम. पटेल महाविद्यालयात स्मरणदिन कार्यक्रम मोठ्या श्रद्धेने संपन्न झाला. कार्यक्रमामध्ये अपघातात जीव गमावलेल्या नागरिकांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. रस्ते अपघात रोखण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात, तसेच वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे महत्व याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी सेफ्टी वेल्फेअर असोसिएशनचे संस्थापक व अध्यक्ष विशाल वि.शेटे यांनी अपघात प्रतिबंधाचे विविध मार्ग, सुरक्षित वाहनचालना आणि रस्ते सुरक्षेची जाण विद्यार्थ्यांमध्ये वाढवण्याचे आवाहन केले. तसेच वाहतूक शाखा डोंबिवलीचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीराम पाटील यांनी वाहतूक नियम, दंडाची तरतूद आणि सुरक्षिततेचे महत्व याबाबत सविस्तर माहिती दिली. महाराष्ट्र जनरल मजदूर संघटनेचे संस्थापक-अध्यक्ष लक्ष्मण मिसाळ यांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करा आणि आपले अनमोल जीवन सुरक्षित ठेवा असा संदेश विद्यार्थ्यांना दिला. प्रादेशिक परिवहन अधिकारी अशितोष बारकूल यांच्या मार्गदर्शनाने परिवहन अधिकारी अभिजित भांगरे (एम.व्ही.आय.) यांनी विद्यार्थ्यांना वाहन परवान्यांबाबत, वाहन तपासणी आणि रस्ते सुरक्षेसंबंधी माहिती दिली. यावेळी मोटार वाहन निरीक्षक प्रणव भुसे व नेहल राठोड उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्या डॉ.माधुरी नंदनवार, एन.एस.एस. समन्वयक रोहिणी वाळवंडे तसेच कल्पना जाधव, अंजु पाल, करिष्मा पाटील, सोनी द्रविड, ममता भारंबे आदी शिक्षक कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन महाविद्यालयाच्या एन.एस.एस. विभागाने केले असून विद्यार्थ्यांमध्ये रस्ते सुरक्षेबाबत जागरूकता वाढविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम प्रशंसनीय ठरला.

## मल्टी कमोडिटी एक्सचेंज मार्फत शासकीय आय.टी.आय. कॉलेजमध्ये कार्यक्रम संपन्न




**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.१८, वडवणी (बीड) :** शासकीय आय.टी.आय. कॉलेज वडवणी येथे भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच एम.सी.एक्स. च्या माध्यमातून आय.टी.आय. च्या विद्यार्थ्यांसाठी दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ रोजी एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य श्री एस.ओ.बनगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून (सेबी) तसेच एम.सी.एक्स. चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर गणेश चौधरी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले. यात त्यांनी विद्यार्थ्यांना डिमॅट अकाउंट, फायनान्शियल मार्केट्स, कमोडिटीचे प्रकार, जागतिक स्तरावर सक्रिय असलेल्या कमोडिटीज, वेअर हाऊसिंग डेव्हलपमेंट रेग्युलेशन ॲक्ट, कमोडिटी व इक्विटीमध्ये असेल असलेला फरक तसेच सेबीच्या सारथी ॲप चे महत्व याचे मार्गदर्शन केले. तसेच गुंतवणूक करत असताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रा.एम.एच.मोमीन, एस.एल. राठोड यांनी विशेष परिश्रम घेत कार्यक्रमाचे आयोजन केले व एस.डी ठोंबरे यांनी सूत्रसंचालन केले. तसेच या कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाजपचे साहिल पाटलांनी स्वखर्चाने तावशी रस्त्यावरचे खड्डे बुजवून केली दुरुस्ती

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१९, शिळफाटा (ठाणे) :** खार्डी शिवाजी चौक ते पडले गावापर्यंत असलेल्या रस्त्यामध्ये मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते. भाजपचे साहिल पाटील यांनी स्वखर्चातून खड्डे बुजवले आहेत. तात्पुरता स्वरूपात का असो ना पण नागरिकांना खड्डे बुजवल्यामुळे दिलासा मिळाला आहे. खरं तर हा रस्ता ऐरोली ते काटई नाका पर्यंत होणार होता पण अजून पर्यंत हा रस्ता तयार झाला नाही आहे. हा रस्ता तयार झाला की १५ मिनिटांमध्ये ऐरोली ते काटई नाका प्रवास करता येणार आहे. निवडणुका आल्या की हा रस्ता तयार होईल असे अनेक वेळा भाषणात बोलताना डॉ.श्रीकांत शिंदे खासदार यांना आपण पाहिले आहे. तीन वेळा खासदार होऊन सुद्धा हा रस्ता अद्याप पर्यंत पूर्ण झालेला नाही आहे. मात्र अनेक वर्षापासून या रस्त्याची दुरुस्ती भाजपचे साहिल पाटील करताना आपल्याला दिसतात. शिळ, खार्डी, फडकेपाडा, डावले, देसाई, पडले, डायघर, खिडकळी, दिवा, काटई,लोढा, डोंबिवली, १४ गावे या सर्वांना या रस्त्याचा उपयोग होतो. जेव्हा वाहतूक कोंडी होते त्यावेळी हा मार्ग सोयीस्कर पडतो. हा रस्ता पक्का होणे गरजेचे आहे. आता तरी खासदार याकडे लक्ष देणार का?

# दिल्ली उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

## TFI पुन्हा अधिकृत; इंडिया तायक्वॉंदोची मान्यता रद्द

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, नवी दिल्ली :** तायक्वांदो खेळातील वादाला अखेर दिल्ली उच्च न्यायालयाने पूर्ण विराम देत मोठा निर्णय दिला आहे. युवा कार्य व क्रीडा मंत्रालयाने (MYAS) ८ मे २०२५ रोजी इंडिया तायक्वांदो (IT) ला राष्ट्रीय क्रीडा महासंघ (NSF) म्हणून दिलेली मान्यता न्यायालयाने बेकायदेशीर ठरवत पूर्णपणे रद्द केली आहे. न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले की हा आदेश खेळ संहितेच्या नियमांना,आधीच्या न्यायालयीन आदेशांना आणि नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांना विरोधात होता.

**TFI चे डि-रिकग्निशन कधीच झाले नव्हते**

सरकारने कोर्टात असा दावा केला होता की २०२४ मध्ये तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडिया (TFI) ची मान्यता नूतनीकरण केली गेली नाही. मात्र न्यायालयाने हा दावा फेटाळून लावत सांगितले की

✼ TFI ची मान्यता मागे घेणारा कोणताही आदेश नव्हता

✼ कारणे दाखवा नोटीसही देण्यात आलेली नव्हती

✼ शिवाय २४.१२.२०२४ आणि १३.०१.२०२५च्या दोन आदेशांत केंद्र सरकारने स्वतः मान्य केले होते की TFI चे डि-रिकग्निशन झालेले नाही

म्हणून TFI ची मान्यता आजही पूर्णपणे वैध असल्याचे न्यायालयाने घोषित केले.

**सरकारकडून प्रक्रिया उल्लंघन**

क्रीडा संहितेनुसार NSF ची मान्यता रद्द किंवा निलंबित करण्यापूर्वी सरकारने नोटीस, चौकशी आणि सुनावणी देणे अनिवार्य आहे.

**न्यायालयाच्या निरीक्षणानुसार -**

ही कोणती ही प्रक्रिया TFI बाबत पाळण्यात आलेली नव्हती.

एका खेळासाठी एकच NSF : कोर्टाची ठाम भूमिका

क्रीडा संहितेतील क्लॉज ३.१० नुसार एका खेळासाठी फक्त एकच मान्यताप्राप्त संघटना राहू शकते.

TFI ला डि-रिकग्नाईज न करता सरकारने India Taekwondo ला मान्यता देणे पूर्णपणे चुकीचे असल्याचे कोर्टाने स्पष्ट केले.

India Taekwondo **च्या स्थापनेवर कोर्टाची टीका...**

**न्यायालयाने नमूद केले की -**

✼ IT ची स्थापना IOA च्या २०१९ ॲडहॉक कमिटीतील सदस्यांनी चुकीच्या पद्धतीने केली

✼ यात हितसंबंधांचा संघर्ष व नैतिक उल्लंघने होती

✼ IOA Ethics Commission ने २०२२ मध्ये केलेल्या गंभीर निरीक्षणांकडे सरकारने दुर्लक्ष केले

**सरकारने या सर्व प्रतिकूल बाबींचा विचार करणे आवश्यक असल्याचे कोर्टाने नमूद केले.**

World Taekwondo चा निर्णय सरकारवर बंधनकारक नाही

**न्यायालयाने कडक शब्दांत म्हटले की -**

✼ भारत सरकार किंवा MYAS हे कोणत्याही आंतरराष्ट्रीय संस्थेचे रबर स्टॅम्प नसावे

✼ मान्यता देताना भारतीय कायदे व क्रीडा संहिताच अंतिम निकष आहेत

**विद्यमान कायदेशीर स्थिती**

TFI : एकमेव अधिकृत संस्था

**न्यायालयाने स्पष्टपणे घोषित केले की**

✼ TFI ची १७.०३.२०२३ मधील मान्यता अजूनही वैध आहे

✼ तिची मान्यता कधीही रद्द किंवा निलंबित झालेली नाही

✼ TFI हेच भारतातील तायक्वांदोचे एकमेव कायदेशीर राष्ट्रीय क्रीडा महासंघ आहे

India Taekwond : **कोणताही कायदेशीर दर्जा नाही**

✼ ०८.०५.२०२५ चा मान्यता आदेश रद्द

✼ गंभीर अनियमितता व हितसंबंधांचा संघर्ष अधोरेखित

✼ IT ला खेळाडू निवडणे, राष्ट्रीय स्पर्धा घेणे किंवा 'India' नाव वापरण्याचा अधिकार नाही

**निर्णयाचा प्रत्यक्ष परिणाम**

TFI **आता करू शकते :**

✼ राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन

✼ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी एन्ट्री पाठवणे

✼ देशातील तायक्वांदोचे एकमेव प्रशासकीय नियंत्रण

IT **आता करू शकत नाही :**

✼ भारताचे प्रतिनिधित्व

✼ NSF म्हणून काम

✼ सरकारी संस्थांसोबत कोणतेही अधिकृत व्यवहार

## जागतिक शौचालय दिनानिमित्त विशेष स्वच्छता मोहीम व सफाईमित्रांचा कृतज्ञ सन्मान






**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१९, नवी मुंबई :** १९ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण जगभरात संयुक्त राष्ट्र संघाने घोषित केल्याप्रमाणे जागतिक शौचालय दिन (World Toilet Day) म्हणून साजरा करण्यात येतो. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने या दिवसाचे औचित्य साधून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका क्षेत्रातील सर्व ४०५ सार्वजनिक व सामुदायिक शौचालयामध्ये विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

त्याचप्रमाणे शौचालयाची दैनंदिन स्वच्छता करणा-या ५६० सफाईमित्रांचा कॅप आणि गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली आयोजित या स्वच्छता आणि सन्मान उपक्रमात घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे हे आकांक्षी शौचालय, कोपरखैरणे येथे स्वच्छता मोहीमेत स्वत: सहभागी झाले होते. त्याचप्रमाणे मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे, उपमुख्य स्वच्छता अधिकारी नरेश अंधेर व विजय पडघन तसेच सर्व विभाग कार्यालयातील स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक व उप स्वच्छता निरीक्षक आणि अभियंता वैभव देशमुख यांनीही शौचालय स्वच्छता मोहीमेत सहभाग घेतला.

शौचालयाचा वापर करा (Use Toilet) असा संदेश लिहिलेला पांढ-या रंगाचा मॅस्कॉट लक्ष वेधून घेत होता.

शौचालयाच्या वापरातून सार्वजनिक आरोग्य, मानवी प्रतिष्ठा व वैयक्तिक सुरक्षा ही उद्दिष्ट साध्य होत असल्याने स्वच्छता, आरोग्य व पर्यावरण यांच्या एकत्रित विचारातून शौचालय वापराला प्राधान्य देण्यात येत आहे. याबाबत जागरूकता वाढविण्यासाठी जागतिक शौचालय दिन (World Toilet Day) साजरा करण्यात येत असतो. नवी मुंबई महानगरपालिकेने या निमित्त शौचालय स्वच्छतेची विशेष मोहीम राबवित तेथील स्वच्छतेसाठी दैनंदिन काम करणा-या सफाई मित्रांच्या कामाचा आदर राखत कृतज्ञ सन्मान केला आहे.

## 'युथ फॉर जॉब' च्या प्रशिक्षणामुळे दिव्यांग तरुणीला मिळाला रोजगार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, चंद्रपूर :** 'युथ फॉर जॉब' ही संस्था दिव्यांग व्यक्तिचे सक्षमीकरण आणि आर्थिक स्वावलंबनासाठी काम करणारी दक्षिण आशियातील सर्वात मोठी संस्था आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिव्यांग युवक – युवतीच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्यासाठी 'युथ फॉर जॉब' या संस्थेच्या माध्यमातून एक नवीन मॉडेल उभारण्याची संकल्पना मांडली आहे. या संस्थेच्या माध्यमातून दिव्यांगांना रोजगारक्षम करणे, युडीआयडी (स्वावलंबन कार्ड) करीता दिव्यांगांची १०० टक्के नोंदणी, लक्षित कौशल्य विकास आणि दिव्यांग व्यक्तिंसाठी शाश्वत उपजिविका निर्माण करणे, हा मुख्य उद्देश असून त्याचा फायदा दिव्यांग नागरिकांना होत आहे. अशाच प्रशिक्षणामुळे सावंगा विठोबा (ता. चंद्रपूर) येथील राजश्री पुरुषोत्तम खोडके (वय ३०) या दिव्यांग तरुणीचा प्रवास अंधारातून प्रकाशाकडे झाला असून ती आज आर्थिक स्वावलंबी झाली आहे. राजश्री ही ४० टक्के अंशत: अंध (दिव्यांग) असून तीने वस्त्र विज्ञान (बॅचरल ऑफ टेक्साईल सायन्स) मध्ये शिक्षण घेतले आहे. राजश्रीच्या कुटुंबात आई –वडील, एक धाकटा भाऊ आणि तिला तीन मोठ्या बहिणी आहेत. वडील पुरुषोत्तम खोडके पूर्वी बल्लारपूर येथील पेपर मिलमध्ये काम करत होते आणि आता निवृत्त झाले आहेत, तर आई गृहिणी आहेत. राजश्रीचा जन्म अमरावती येथे झाला, परंतु वडिलाच्या नोकरीमुळे कुटुंब बल्लारपूर येथे स्थलांतरित झाले. लहाणपणीच राजश्रीला त्वचाविकारा मुळे दृष्टिदोष झाला. ज्यामुळे तिची दृष्टी मोठ्या प्रमाणात कमी झाली. या परिस्थितीमुळे शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण काळात तिला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. शैक्षणिक मर्यादांसह सामाजिक परिणामाला सुध्दा तिला सामोरे जावे लागले. मात्र अतिशय आत्मविश्वासाने तिने वस्त्र विज्ञान शाखेची पदवी पूर्ण केल्यांनतर रोजगाराच्या संधी शोधायला सुरवात केली. जेव्हा तिला 'युथ फॉर जॉब' बद्दल मित्र महेश मेश्राम यांनी माहिती दिली, तेव्हापासून तिच्या आयुष्यात निर्णायक क्षण आला. राजश्रीने आत्मविश्वासाने एक महिन्याच्या कौशल विकास प्रशिक्षण कार्यक्रमात प्रवेश घेतला आणि स्वत:ला सक्षम आणि स्वावलंबी बनवण्याच्या दृढ निश्चय केला. प्रशिक्षणादरम्यान राजश्रीने सर्व उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. तसेच आपल्या सहकाऱ्यांना प्रोत्साहन दिले, मदत केली आणि नेतृत्वाचे गुण दाखवले. प्रशिक्षणादरम्यान संवादकौशल्य, वेळेचे व्यवस्थापन, समस्या सोडवण्याचे तंत्र, कार्यस्थळी शिष्टाचार आणि मुलाखत तयारी यासारखी महत्वाची कौशल्ये तिने आत्मसात केली. या कौशल्यांनी तिचा आत्मविश्वास आणि रोजगारक्षमता वाढण्यास मदत झाली. प्रशिक्षणानंतर राजश्रीने भूपेंद्र गौड टीएम पोषणतज्ज्ञ यांच्याकडे मुलाखत दिली आणि ग्राहक सहाय्यक (कस्टमर सपोर्ट एक्झिक्युटीव्ह) या पदासाठी तिची निवड झाली. आता ती वार्षिक १ लक्ष ८० हजार रुपये इतके स्थिर उत्पन्न कमवत आहे, ज्यामुळे तिचे आणि तिच्या कुटुंबाचे जीवनमान सुधारले आहे. एकेकाळी ज्या कमी दृष्टिक्षमतेमुळे ती आत्मविश्वास गमावून बसली होती, त्या बाबींवर यशस्वीरित्या मात करत 'युथ फॉर जॉब' च्या प्रशिक्षणामुळे ती आज पुन्हा आत्मविश्वासाने उभी आहे.'

## दिव्यातील महिला बचत गटाला शैलेश पाटील यांचा मदतीचा हात



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१९, दिवा (ठाणे) :** दिवा शहरातील महिला बचत गटाला मदतीचा हात मिळाल्याने मोठं पाठबळ मिळाले आहे. दिवा शहरातील कार्यसम्राट मा. नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांच्या वतीने आज श्री समर्थ चरण व सदगुरू कृपा महिला बचत गटाला स्वयंरोजगार मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. भाकरी तयार करण्याच्या यंत्र तसेच इतर सामग्री देऊन सदर महिला बचत गटास पुढे ही लागेल ते सहकार्य करण्याचे आश्वासन शैलेश पाटील यांनी दिले आहे. महिलांच्या उदरनिर्वाहासाठी व महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांचा नेहमीच पुढाकार असतो असे त्यांचे निकटवर्तीय व विभाग प्रमुख भालचंद्र भगत यांनी बोलताना स्पष्ट केले आहे. बचत गटामुळे महिला सक्षम होत आहेतच, त्याच बरोबरीने अनेक महिलांच्या छोटया मोठ्या उद्योगाना पाठबळ मिळत आहे. दिवा पश्चिम या भागातील महिलांनी अनेक छोटे मोठ्या व्यवसायाना जोड दिली आहे. २०० पेक्षा अधिक महिलांना ऑटो रिक्षा आणि इतर महिलांना पाटील यांनी मदतरुपी सहकार्य केल आहे. तसेच दिवा विकास प्रतिष्ठानच्या वतीने महिलांना अनेक सरकारी योजनांचा लाभ मिळवून दिला जातो. दिवा शहरातील प्रत्येक सामाजिक उपक्रमांमध्ये बचतगटातील महिलांचा पुढाकार असतो असे बचत गटाच्या काही महिलांनी सांगितले असून श्री समर्थ चरण व सदगुरू कृपा महिला बचत गटाच्या सर्व महिलांनी श्री.पाटील यांचे अभिनंदन करून आभार मानले आहेत.

# आमदार दाते यांच्या वर्षपूर्ती सोहळ्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे लोकमान्य आणि जनसंपर्कशील नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे आमदार काशिनाथ दाते यांच्या आमदारकीच्या यशस्वी वर्षपूर्तीचा भव्य आणि उत्साहवर्धक कार्यक्रम नवनागापूर येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. आमदार दाते यांच्या जनसंपर्क, विकासदृष्टी आणि समाजाभिमुख कार्याची जनतेने घेतलेली दखल या सोहळ्यात पाहायला मिळाली. कार्यक्रमाचा उत्साहवर्धक माहोल हा आमदार दाते सरांवरील जनतेच्या प्रेमाचा आणि विश्वासाचा जिवंत पुरावा होता. दरम्यान पारनेर तालुक्यातील गावांसाठी ६० कोटी तर नगर तालुक्यातील गावांसाठी ९ कोटींचा निधी दिल्याची माहिती दिली.

या कार्यक्रमाला अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली. त्यात शितलताई संग्रामभैय्या जगताप, सुमन काशिनाथ दाते, उद्योजक दिलीप दाते, अर्चना दिलीप दाते, अप्पासाहेब (बंडूनाना) सप्रे, वडगाव गुप्ताचे माजी सरपंच विजयराव शेवाळे, सुभाष दांगट, सागर सप्रे, दीपक गीते, डॉ. संजीव गडगे, ताराचंद डोंगरे, भाजप कार्याध्यक्ष रामभाऊ घाडगे, आप्पा पवार, हर्षद पटेल, राहुल सप्रे, महेश कांडेकर, धनराज सप्रे, सनी सप्रे, नरेश शेळके, रेणुका पुंड, नितीन खंदारे, हेमंत लगड,

> हा वर्षपूर्ती सोहळा हा माझा नाही, तर पारनेर-नगर मतदारसंघातील जनता आणि कार्यकर्त्यांच्या प्रेमाचा उत्सव आहे. एका वर्षात केलेली कामे ही सर्वांची सामूहिक ताकद आणि जनतेच्या सहकार्यामुळेच शक्य झाली. 'खेळ पैठणीचा' उपक्रमात बहिणींनी दाखवलेला उत्स्फूर्त सहभाग माझ्यासाठी मोठी प्रेरणा आहे. आगामी काळातही विकासकामांचा वेग आणखी वाढवून जनतेच्या विश्वासाला पात्र राहण्याचे माझे प्रयत्न सुरूच राहतील.
>
> **- आमदार काशिनाथ दाते**

प्रतीक दादा शेळके, ससोनूताई शेवाळे, सुशीला जगताप, यांसह परिसरातील महिला भगिनींचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता.

या प्रसंगी मतदारसंघातील पारनेर आणि नगर तालुक्यातील ४० गावांमध्ये एकाच वर्षात करण्यात आलेल्या विविध विकासकामांचा सविस्तर आढावा मांडण्यात आला. सन २०२४-२५ आणि २०२५-२६ या आर्थिक वर्षांत आमदार दाते सरांच्या पाठपुराव्यामुळे पारनेर तालुक्यासाठी ६०२४.३५ लाख आणि नगर तालुक्यातील मतदारसंघात समावेश असलेल्या चाळीस गावांसाठी ९२८.२५ लाख, अशी एकूण ६९५२.६० लाख रुपयांची कामे मंजूर झाल्याची माहितीही

## पारनेरला ६० तर नगर तालुक्याला ९ कोटींचा निधी




उपस्थित जनतेसमोर यावेळी मांडण्यात आली. रस्ते, पाणी, वीज, शिक्षण, आरोग्य, तांडा वस्ती सुधारणा, जनसुविधा, पर्यटन विकास, पंचायत सेवा-विस्तार अशा विविध क्षेत्रांमध्ये गतीमान झालेल्या शेकडो कामांमुळे मतदारसंघाच्या विकासाचा आलेख उंचावल्याचे चित्र यावेळी स्पष्ट झाले.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरला तो महिलांसाठी आयोजित करण्यात आलेला खेळ पैठणीचा हा उपक्रम. हजारो लाडक्या बहिणींच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. महिलांच्या सन्मानासाठी आयोजित केलेला हा उपक्रम आमदार दाते सरांच्या संवेदनशीलतेचा आणि सांस्कृतिक मूल्यांबद्दलच्या आदरभावाचा उत्कृष्ट प्रत्यय देणारा ठरला. लाडक्या बहिणींनी उत्स्फूर्त सहभागातून व्यक्त केलेले प्रेम आणि आनंद या संपूर्ण सोहळ्याचे वैशिष्ट्य ठरले.

या भव्य कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन आमदार काशिनाथ दाते मित्र मंडळ, नवनागापूर – वडगाव गुप्ता आणि स्थानिक ग्रामस्थांनी उत्कटतेने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेत स्थानिक जनतेचा उत्साह आणि एकात्मता स्पष्टपणे जाणवत होती. दाते सरांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेला विकासप्रवास आगामी काळातही अशाच पद्धतीने गतीमान होत राहो आणि मतदारसंघ प्रगतीच्या नवीन उंचीवर पोहोचोअशा शुभेच्छा यावेळी उपस्थित नागरिकांनी दिल्या.

# थोडक्यात

## मिरारोड येथील प्रशस्त नाट्यगृहात जाखडी नृत्य स्पर्धेचे आयोजन




**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१९, मुंबई :** कोकणातील कलगी तुरा लोककला आणि शाहिरी परंपरा जोपासणारी,महाराष्ट्राच्या कलाप्रवाहातील अग्रगण्य अर्थात गेली ६५ वर्ष कलगी तुरा लोककला संवर्धनपर अविरत कार्यरत असणारी कलगी तुरा समाज उन्नती मंडळ मुंबई संस्थेच्या वतीने मुंबई नगरीत प्रथमच गौरी गणेश नृत्य स्पर्धा-२०२५ चे आयोजन करण्यात आले असून रविवार दिनांक ०७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते रात्रौ ०८ वा. भारतरत्न स्व.लता मंगेशकर नाट्यगृह, दहिसर चेक नाका जवळ ,महाजन वाडी मीरारोड (पूर्व) येथे विभग फाउंडेशन चे संस्थापक /अध्यक्ष,संस्थापक, युवक महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उपाध्यक्ष सुशांत गणेश जाबरे आणि विविध क्षेत्रातील प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहेत. स्पर्धेत सहभागी संघ स्पर्धकांतून विजेत्यांना प्रथम पारितोषिक ११०००/- द्वितीय पारितोषिक ७०००/- तृतीय पारितोषिक ५०००/- सह आकर्षक स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र, ढोलकी देऊन गौरविण्यात येणार आहे. त्याचबरोबर उत्कृष्ट गायक पारितोषिक करा ओके माईक, उत्कृष्ट ढोलकी पट्टू ढोलकी सह आकर्षक सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविले जाणार आहे. तसेच सदर कार्यक्रमावर कलगी तुरा दिनदर्शिका -२०२६ प्रकाशन, वरिष्ठ / युवा शाहीर गुणगौरव सोहळा त्याच बरोबर राज्यातील सामाजिक /पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना कलगी तुरा पुरस्कार -२०२५ ने गौरविण्यात येणार असल्याचे उपरोक्त संस्थेचे सरचिटणीस संतोष धारशे यांनी महत्वपूर्ण माहिती दिली. कलगी तुरा समाज उन्नती मंडळ मुंबई संस्थेच्या माध्यमातून मुंबई उपनगरत गौरी गणेश नृत्य स्पर्धेचे प्रथमच आयोजन होत असल्याने सदर सोहळा भव्यदिव्य होण्यासाठी उपरोक्त संस्थेचे मुख्य पदाधिकारी/ सदस्य जोरदार तयारीला लागले आहेत.


## वडमाळवाडीतील आदिवासी महिलांचे आमरण उपोषण १५ दिवसांसाठी तुर्तास स्थगित

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, पेण (रायगड) :** पेण तालुक्यातील दुष्मी-खारपाडा ग्रुप ग्रामपंचायतीतील वडमाळवाडी येथील आदिवासी ग्रामस्थ पाणीपुरवठा योजनेस वाढीव निधी मिळावा यासाठी उद्यापासून (२० नोव्हेंबर २०२५) पेण पंचायत समिती कार्यालयासमोर बेमुदत उपोषणास बसणार होते.

मात्र या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर पेण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गजानन लेंडी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार दिनांक १९ नोव्हेंबर रोजी वडमाल वाडीतील उपोषणकर्त्या आदिवासी महिला प्रतिनिधी, जागृती कातकरी, चंद्रभागा पवार,मनीषा वाघे शेवंता कातकरी,गुलाब वाघे, यमुना वाघे, मंगळी वाघे,पोशी वाघे, सुमन वाघे, रंजना वाघे,रायगड जिल्हा परिषदे च्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या उप अभियंता शेफाली देशमुख, कनिष्ठ अभियंता स्नेहा जाधव, ऋशीकेश म्हात्रे आणि ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष, रायगड भूषण सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, सामाजिक कार्यकर्त्या मानसीताई पाटील यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली असून या बैठकीत आदिवासींच्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी अजून पंधरा दिवसांचा कालावधी द्यावा अशी विनंती करीत उपोषण मागे घेण्याची विनंती केलेवरून गुरुवार दिनांक २० नोव्हेंबर पासून पेण पंचायत समिती कार्यालयासमोर होणारे आदिवासी भगिनींचे आमरण उपोषण पुढील पंधरा दिवसांसाठी स्थगित करण्यात आले असल्याची माहिती उपस्थित आदिवासी भगिनींनी दिली आहे.

दरम्यान स्वातंत्र्यानंतर तब्बल ७६ वर्षांपासून वडमाल वाडीला पिण्यासाठी शुद्ध पाणी नव्हते. यासाठी आदिवासिंनी मोठा संघर्ष करून जल जीवन मिशन योजना मंजूर होऊनही शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होत नाही म्हणून आदिवासी ग्रामस्थ



संतप्त झाले आहेत.श्री महालक्ष्मी महिला बचत गट व ग्रामस्थांनी सव्वीस जानेवारी २०२३ रोजीच्या ग्रामसभेत ठराव करून दोन वर्षांपासून अर्ज, मोर्चे, आंदोलने आणि उपोषणे केली. पाठपुराव्यानंतर जिल्हा परिषदेचे अधिकारी व पाणीपुरवठा अभियंता यांनी प्रत्यक्ष वाडीला भेट देऊन जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना व रस्ता मंजूर केला. प्रारंभीचा आराखडा बेचाळीस लाखांचा होता, मात्र मंजुरी फक्त छत्तीस लाख रुपयांना मिळाल्याने काम अर्धवट राहिले.वाढीव निधीसाठीचा प्रस्ताव आदिवासी विकास विभाग व जिल्हा नियोजन समितीकडे गेल्या वर्षी पाठविला असला तरी अद्याप मंजुरी मिळालेली नाही.

त्यामुळे वाडीतील एका भागाला अजूनही पिण्याचे पाणी मिळालेले नाही. निधी तात्काळ उपलब्ध करून काम पूर्ण करावे या मागणीसाठी शेवटचा पर्याय म्हणून श्री महालक्ष्मी आदिवासी महिला बचत गटाच्या अध्यक्षा नर्मदा वाघे व इतर सर्व ग्रामस्थानी आमरण उपोषणाचा निर्णय घेतला होता.

## चिंतलधाबा येते रक्तदान शिबिराचे आयोजन

**अक्षराज : अरुण कुत्तरमारे**




**दि.१९, पोंभुर्णा (चंद्रपूर) :** आरोग्य दूत आमदार देवराव भोंगळे राजुरा यांच्या वाढदिवसानिमित्त श्री देवरावदादा भोंगळे मित्र परिवाराच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन २१ नोव्हेंबर सामाजिक सभागृह चिंतलधाबा येथे करण्यात येणार आहे. घोसरी- चिंतलधाबा जि. प. क्षेत्रातून जि. प. सदस्य म्हणून प्रतिनिधीत्व केलं तेव्हापासून पोंभुर्णा तालुक्यात कुठे ना कुठे वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबीर व रक्तदान शिबिर आयोजित करून सेवेचा आदर्श घडवत आहे. यावर्षी सुद्धा चिंतलधा बा येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. त्यानिमित्ताने जास्त जास्त रक्तदाता युवकांनी युवकांनी रक्तदान करून सहकार्य करण्याची आव्हान आयोजकांनी केले आहे.

## मुख्यालयात माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंती निमित्ताने अभिवादन



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१९, पनवेल :** महानगरपालिकेच्या मुख्यालयात आज बुधवार दि. १९/११/२०२५ रोजी भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंती निमित्ताने आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

तसेच राष्ट्रीय एकात्मता दिनानिमित्ताने राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेण्यात आली. यावेळी अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त मंगला माळवे, उपायुक्त स्वरूप खारगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, लेखा अधिकारी संग्राम ऱ्होरकाटे, पशुवैद्यकिय अधिकारी डॉ. भगवान गीते, सामान्य प्रशासन किर्ती महाजन, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## उन्नत ठाणे हायस्पिड लोकल स्टेशनला (Lap) भूमिपुत्र ग्रामस्थांचा विरोध

### ठाणे महानगरपालिकेत हरकती नोंदवून केला विरोध !

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१९, दिवा (ठाणे) :** लोकल एरिया प्लॅन या महत्त्वाच्या आराखंड्या विरोधात हरकत नोंदवण्यासाठी ठाणे महापालिका क्षेत्रातील दतिवली, म्हातार्डी, बेतवडे, आगासन,उसघर आणि संपूर्ण हायस्पिड रेल्वे स्टेशन परिसरातील सर्व ग्रामस्थ शेतकरी बांधव आणि भूमिपुत्र यांनी १७ नोव्हेंबर २०२५ रोजी हरकती नोंदविल्या आहेत. रेल्वे हायस्पिड Lap क्षेत्राला भाजपच्या पदाधिकारी रेश्मा पवार, ग्रामस्थ भूमिपुत्र आणि आगरी महिला शक्ती प्रतिष्ठांच्या अध्यक्षा उषा मुंडे यांनी विरोध केला आहे. ग्रामस्थांच्या जमिनीवर, घरावर आणि गावाच्या अस्तित्वावर आलेल्या संकट विरोधात आवाज उठवला आहे. २००० पेक्षा जास्त हरकती नोंदवण्यात आल्या आहेत. दातीवली,म्हातार्डी,बेतवडे,आगासन उसरघर आणि संपूर्ण हाय स्पीड रेल्वे स्टेशन



परिसरातील सर्व ग्रामस्थांनी एकत्रित येत लोकल एरिया प्लॅन विरोधात ठाणे महानगरपालिका कार्यालयात हरकती नोंदवून आवाज उठवला आहे. आता ठाणे महानगरपालिका काय निर्णय घेते हे पाहायचं ठरणार आहे.

## महाबळेश्वर गिरिस्थान सार्वत्रिक निवडणूक २०२५

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.१९, महाबळेश्वर :** १८/११/ २०२५ रोजी झालेल्या छाननीत वैध झालेले अर्ज, **नगराध्यक्ष पदाचे उमेदवार पुढील प्रमाणे**

१)कुमार शिंदे (अपक्ष) २) सुनिल शिंदे (राष्ट्रवादी कॉंग्रेस व अपक्ष) ३) नासीर मुलाणी (अपक्ष) ४) डी.एम. बावळेकर (लोकमित्र जनसेवा अघाडी ) ५)राजेश कुंभारदरे (अपक्ष), ६) संजय पाटील (अपक्ष), ७) सतिश सांळुखे (अपक्ष) या उमेदवारांनी नगराध्यक्ष पदासाठी आपले अर्ज दाखल केले.

**तर नगरसेवक पदाकरिता...**

**प्रभाग क्र. १ (अ) :** राजु नालबंद (अपक्ष), युसुफ शेख (राष्ट्रवादी काँग्रेस), आशा ढेबे(अपक्ष), शंकर ढेबे (लोकमित्र जन सेवा अघाडी), सुरज अखाडे (अपक्ष)

**प्रभाग क्र. १ (ब) :** विद्या बावळेकर (राष्ट्रवादी कॉग्रेस), नावेज बडाणे (अपक्ष), झिनत चौगुले (अपक्ष), प्रियांका बावळेकर(अपक्ष).

**प्रभाग क्र. २ (अ) :** प्रशांत अखाडे (अपक्ष), संतोष अखाडे (राष्ट्रवादी काँग्रेस ), किरण काळे(लोकमित्र जनसेवा आघाडी), असिफ सत्तार शेख (अपक्ष), सुनिता आखाडे(अपक्ष), आशा ढेबे (अपक्ष).

**प्रभाग क्र. २ (ब) :** संगिता वाडकर (राष्ट्रवादी), सोनाली बांदल (अपक्ष), अर्चना पाटणे (अपक्ष)

**प्रभाग क्र. ३ (अ) :** विमल पारठे (राष्ट्रवादी कॉंग्रेस), पुजा उतेकर (अपक्ष), आशा ढेबे (अपक्ष).

**प्रभाग क्र. ३ (ब) :** हेमंत साळवी (अपक्ष), रविंद्र कुंभारदरे (भाजप), विशाल तोष्णीवाल (राष्ट्रवादी), प्रविण जिमन (अपक्ष).

**प्रभाग क्र. ४ (अ) :** कुमार शिंदे (अपक्ष), संजय कदम (राष्ट्रवादी), किरण शिंदे (अपक्ष), बाळकृष्ण सांळुखे (लोकमित्र जनसेवा आघाडी), सुमित कांबळे (अपक्ष).

**प्रभाग क्र. ४ (ब) :** वंदना ढेबे (राष्ट्रवादी), पुजा उतेकर (अपक्ष), विमल ओंबळे (अपक्ष)

> १८/११/ २०२५ रोजी छाननी वेळी आलेल्या हरकती नगराध्यक्ष पदा करिता आलेल्या ४ हरकती व नगरसेवक पदा करिता आलेल्या ६ नामनिर्देशन अर्जाच्या सर्व हरकती मा. निवडणुक निर्णय अधिकारी यांनी फेटाळल्या.

शर्मिला वाशिवले (अपक्ष), विमल बिरामणे (अपक्ष).

**प्रभाग क्र. ५ (अ) :** अपर्णा सलागरे (राष्ट्रवादी), सुरेखा देवकर (अपक्ष), प्रभा नायडू (अपक्ष), सना शेख (अपक्ष), स्मिता पाटील (अपक्ष).

**प्रभाग क्र. ५ (ब) :** संजय जंगम (राष्ट्रवादी), राजेश कुंभारदरे (अपक्ष), विजय नायडू (अपक्ष), विशाल कुंभारदर `(अपक्ष), प्रतिक जंगम (अपक्ष)

**प्रभाग क्र. ६ (अ) :** निता झाडे (अपक्ष), उषा कोंडके (राष्ट्रवादी).

**प्रभाग क्र. ६ (ब) :** संतोष शिंदे (राष्ट्रवादी), समिर सुतार (अपक्ष ), दुर्वेश प्रभाळे (अपक्ष), राहुल भोसले (अपक्ष), सतिश ओंबळे (अपक्ष) मनोहर जाधव (अपक्ष)

**प्रभाग क्र ७ (अ) :** शबाना मानकर (अपक्ष), तरन्नुम वलगे (राष्ट्रवादी )

**प्रभाग क्र. ७ (ब) :** नासिर मुलाणी (राष्ट्रवादी ), सलिम बागवान (अपक्ष)

**प्रभाग क्र. ८ (अ) :** स्वप्नाली शिंदे (अपक्ष ), प्रियंका वायदंडे(राष्ट्रवादी), अश्विनी वायदंडे (अपक्ष), शुभांगी शिंदे (अपक्ष).

**प्रभाग क्र. ८ (ब) :** राजेश कुंभारदरे (अपक्ष), राहुल पिसाळ (राष्ट्रवादी), संगिता गोंदकर (अपक्ष)

**प्रभाग क्र. ९ (अ) :** रेश्मा ढेबे (राष्ट्रवादी), संगिता हिरवे (अपक्ष), मेघा ढेबे (अपक्ष)

**प्रभाग क्र. ९ (ब) :** अफजल सुतार (राष्ट्रवादी), समीर सुतार (अपक्ष), मोअजम नालबंद (अपक्ष), अशिष चोरगे (लोकमित्र जनसेवा आघाडी)

**प्रभाग क्र. १० (अ) :** अश्विनी ढेबे (भाजप), सुनिता ढेबे( लोकमित्र जनसेवा अघाडी), लता आरडे (अपक्ष), पल्लवी कोंडाळकर (राष्ट्रवादी), सिमा तोडकर (अपक्ष), सुनिता आखाडे (अपक्ष)

**प्रभाग क्र. १० (ब) :** रोहित ढेबे (राष्ट्रवादी), मनिष मोहिते (भाजप), विनोद गोळे (अपक्ष), संदिप कोंडाळकर (अपक्ष)